# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२१०४५
०२०–२५६२१०४८
०२०–२५६२१०४९

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:– अंगुसिक/३८५ दिनांक – २४/०३/२०२३

### महत्वाचे व अत्यंत तातडीचे स्मरणपत्र

प्रति,
मा. प्राचार्य,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व
नॉन–एआयसीटीई अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय – **माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS)** वेबपोर्टलवर सन २०२२–२३ या वर्षाची **माहिती नोंदविणेबाबत.**

संदर्भ – मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे–१ यांचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/**एमआयएस**/२०२२–२३/३५२७, दि. १७ मार्च, २०२३.

महोदय/महोदया,

प्रतिवर्षाप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षाची सांख्यीकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे,अहमदनगर, नाशिक जिल्हयामधील व दादरा नगर हवेली या केंद्र शासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांस **DHEMIS वेबपोर्टलव्दारे माहिती १६/०३/२०२३ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. (सोबत प्रत)**

सन २०२२–२३ मध्ये /पूर्वी ज्या महाविद्यालयांना राज्य सरकारकडून मान्यता व प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक विभागाकडून संलग्नीकरण मिळालेले आहे, अशा सर्व महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणाली** कार्यक्रम **M.I.S.** वर नोंदणी करून माहिती भरणे बंधनकारक आहे. जर संबधित महाविद्यालयांनी सदर वेबपोर्टलवर नोंदणी केली नाही तर भविष्यात होणाऱ्या नुकसानीस संबधीत महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मा. नोडल अधिकारी जबाबदार असतील याची कृपया गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी.

तसेच सन २०२२–२३ हया वर्षात विद्यापीठाशी नव्याने संलग्नित असलेल्या महाविद्यालयांना नव्याने मान्यता मिळालेली आहे, अशा महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणाली** कार्यक्रम **M.I.S.**

कार्यक्रमाअंतर्गत संबधीत वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविद्यालयांची माहिती (Excel Sheet) मध्ये मा. संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाच्या iqac@unipune.ac.in या मेलवर त्वरीत उपलब्ध करून दयावी, सोबत नमुना देण्यात येत आहे. सदर नवीन महाविद्यालयांची माहिती दि. २५/०३/२०२३ पर्यंत मा. संचालनालयाने दिलेल्या नमुन्यात पाठवावी. तसेच दि. २५/०३/२०२३ नंतर कोणत्याही महाविद्यालयाचे नाव सदरच्या प्रणाली मध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या मा.प्राचार्य/मा.नोडल अधिकाऱ्यांची राहील.

तसेच मा. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त ज्या महाविद्यालयांना २०२१—२२ पुर्वीची/मध्ये मान्यता मिळालेली आहे, परंतु अद्यापही त्यांनी आपल्या महाविद्यालयांची नोंद (रजिस्ट्रेशन), मा. उच्च शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर केलेली नाही अशा सर्व महाविद्यालयांनी, तसेच **अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE)** च्या वेबपोर्टलवर/नोंदणी केलेली आहे, परंतु उच्च शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर/नोंदणी केलेली नाही अशा प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयांनी मा. उच्च शिक्षण संचालनालयाच्या www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टल नोंदणी/रजिस्ट्रेशन करून, दि. ३० सप्टेंबर, २०२२ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शिक्षकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदविणे अनिवार्य आहे.

संबधीत महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणाली** कार्यक्रम **M.I.S.** मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२२—२३ ची माहिती पुर्णपणे भरल्यानंतर सदर महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून विहीत मुदतीत **"ना—हरकत प्रमाणपत्र"** प्राप्त करून घेणे बंधणकारक आहे याची महाविद्यालयांच्या मा. प्राचार्य/मा. नोडल अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी **दि. १० एप्रिल, २०२३** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे. या संदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, ०२०—२५६२१०४८/४९ यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

for (श्री. श्रीकांत गायकवाड)
सहायक कुलसचिव,

**प्रत माहितीसाठी —**

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
२. कार्यकारी सहायक, मा. प्र—कुलगुरू कार्यालय,
३. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

# New College Addition in MIS for year 2022-23

| Sr. No. | College Type | AISHE Code | College Name | Address | District | Taluka | Affiliating University Name | Year from Which Admission Started | Year Establishment | Head of the Institute | Contact No. | email ID |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | |